# एस. एन. मोर महाविद्यालय, तुमसर

## राष्ट्रीय सेवा योजना,

## विशेष शिबिर

दि. 02 फेब्रुवारी 2023 ते 07 फेब्रुवारी 2023 या दरम्यान एस. एन. मोर महाविद्यालयातील रासेयो चे विशेष शिबोर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कोष्टी, तह. तुमसर, जि. भंडारा या ठिकाणी मोठ्या उत्साहात पार पाडला.

दि. 3 फेब्रुवारी 2023 रोजी रासेयो चे उद्घाटन कार्यक्रम दुपारी 12:00 वाजता घेण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्घाटन तुमसरच्या एस.डी.पी.ओ. मॅडम रश्मिथा राव (आय.पी.एस.) यांच्या हस्ते करण्यात आले. तर कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी. बी. मसराम होते. या कार्यक्रमात रश्मीथा राव मॅडम व मा. प्राचार्य साहेबांनी रासेयो च्या स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले.

याप्रसंगी मंचावर कोष्टी गावचे सरपंच श्री. अंकित बोंबार्डे व उपसरपंच श्री. रामकृष्ण ढबाले प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. लक्ष्मण पेटकुले, (कार्यक्रम अधिकारी) यांनी केले. तर आभार बी.ए. तृतीय वर्षाचा विद्यार्थी प्रणय कुंभारे यांनी मानले.

यावेळी कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, प्राध्यापिका, रासयो चे स्वयंसेवक व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.










दिनांक 04 फेब्रुवारी 2023 रोजी सकाळी 05:30 वाजता स्वयंसेवकांसाठी प्रार्थना व एन.एस.एस. गीत घेण्यात आले. सकाळी 06:00 वाजता व्यायाम, योगा व रनिंग करण्यात आले. सकाळी 08:00 ते सकाळी 11:00 वाजतापर्यंत विद्याथ्याचे श्रमदान घेण्यात आले. यामध्ये

विद्याथ्यानी गावातील स्वच्छ रस्ते प्लास्टिक निर्मूलनाचे कार्य केले. तसेच ग्रामपंचायत स्वच्छता करण्यात आले व गावातील लोकांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले.

दुपारी 01:00 वाजता बौद्धिक समाजामध्ये डॉ. रेणुकादास उबाळे यांचे व्याख्यान 'मराठी भाषा व संस्कृती' या विषयावर व्याख्यान घेण्यात आले. यावेळी बौद्धिक सत्राचे अध्यक्ष डॉ. बी. डी. काटेखाये मॅडम होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. अमोल खांदवे उपस्थित होते. यावेळी मोठ्या संख्येने रासयो चे शिबिरार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तृप्ती मोहनकर या विद्यार्थिनीने केले. तर आभार निकिता परतेती या विद्यार्थिनीने मानले.

संध्याकाळी 07:00 वाजता रासेशे च्या विद्याथ्यानी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले. या मध्ये नृत्य, नाटक व गीत आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रा. लक्ष्मण पेटकुले (कार्यक्रम अधिकारी रासेयो) यांनी परिश्रम घेतले.










दि. 05 फेब्रुवारी 2023 सकाळी 05:30 वाजता रासेयो च्या स्वयंसेवकांसाठी विद्यापीठ गीत व प्रार्थना घेण्यात आली. यानंतर योगा, व्यायाम व रनिंग करण्यात आले. सकाळी 08:00 वाजता रासयो च्या शिबिराथ्यानी कोष्टी गावात श्रमदान घेण्यात आले. यावेळी गावातील नाली, स्वच्छता निर्मूलन रस्त्यांची स्वच्छता व अंधश्रद्धा, स्वच्छ गाव सुंदर गाव हया म्हणीच्या माध्यमातून गावक—यांमध्ये जनजागृती करण्यात आली.

दुपारी 01:00 वाजता बौद्धिक सत्रामध्ये 'लोकशाही व नवमतदारांची भूमिका' या विषयावर राज्यशास्त्राचे प्राध्यापक डॉ. सचिन वेरूळकर यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष रा.से.यो. चे कार्यक्रम अधिकारी प्रा. लक्ष्मण पेटकुले होते. तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निखिल वंजारी या विद्याथ्याने केले. तर आभार स्वाती पारधी हीने मानले.

संध्याकाळी 07:00 वाजता सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.










दिनांक 06 फेब्रुवारी 2023 रोजी सकाळी 05:30 वाजता शिबिरार्थींनी एनएसएस गीत व प्रार्थना घेतली. त्यानंतर योगा, व्यायाम व रनिंग करण्यात आले. त्यानंतर सकाळी 08:00 ते 11:00 वाजता पर्यंत स्वच्छता अभियान कार्यक्रम घेण्यात आले. यामध्ये कोष्टी गावाची रस्ते, नाल्या, प्लास्टिक ची मोहीम हाती घेण्यात आली व याप्रसंगी गावक—यांचे प्रबोधन व जनजागृती ही करण्यात आली.

दुपारी 01:00 वाजता बौद्धिक सत्रात डॉ. जयंतकुमार मस्के यांचे 'रासेयो व युवकांपुढील आव्हाने' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. या बौद्धिक सत्राचे अध्यक्ष एन.एस.एस. कार्यक्रम अधिकारी प्रा. लक्ष्मण पेठकुले होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एनएसएस स्वयंसेवक जानवी बांगरेंनी केले तर आभार विशाल पासवान याने मानले.

सायंकाळी 07:00 वाजता रासेयो च्या स्वयंसेवकांनी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये गीत, नृत्य आणि नाटिका सादर करण्यात आले.










दिनांक 07 फब्रुवारी 2023 रोजी सकाळी 05:30 वाजता विद्याथ्यासाठी एन.एस.एस. गीत व प्रार्थना घेण्यात आली. यानंतर स्वयंसेवकांनी योगा, व्यायाम व रनिंग घेण्यात आले. सकाळी 08:00 ते 11:00 वाजतापर्यंत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कोष्टी येथील शाळेच्या स्वच्छतेचे काम हाती घेण्यात आले. दुपारी 12:00 वाजता शिबिराचे समारोपीय कार्यक्रम घेण्यात आले. या

कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून आय.क्यू.ए.सी. चे समन्वयक डॉ. राधेशाम दिपटे उपस्थित होते. तर समारोपोय कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. राहुल भगत होत व तसेच मंचावर या गावचे प्रथम नागरिक सरपंच व उपसरपंच उपस्थित होते.










या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. लक्ष्मण पेटकुले (कार्यक्रम अधिकारी रासेयो) यांनी केले. तर आभार एन.एस.एस. स्वयंसेवक प्रणय कुंभारे यांनी मानले व राष्ट्रगीताने या सात दिवसीय विशेष शिबिराचे समारोप करण्यात आले.